# एकरूप परिनियम मुद्दा क्र. १(१२)

**१२. मतदान केंद्रावरील निवडणुकीची प्रक्रिया :—**

जेव्हा निवडणूक घेण्यात येते आणि तीमध्ये मतदान केंद्रांवर मते नोंदविली जातात अशा सर्व प्रकरणांत, मतपत्रिकांद्वारे मत नोंदविण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे असेल :—

(१) कुलसचिवांकडून मतदान केंद्रे निश्चित केली जातील. कुलसचिव मतदान केंद्रावर आवश्यक असतील तितक्या मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करील.

(२) संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याचे तास आगाऊ निश्चित करण्यात येतील आणि निवडणुकीच्या सूचनेत ते नमूद करण्यात येतील.

(३) निवडणूक सुरळीत आणि वेळेवर पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक पायाभूत सोयी, पूरक सुविधा आणि मनुष्यबळ पुरवण्याची जबाबदारी ही संलग्न किंवा संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थांच्या प्रमुखांची असेल.

(४) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे, नामनिर्देशने मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर तीन दिवसांच्या आत मतदारांना कळविण्यात येतील.

(५) मतदान अधिकारी, मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था राखली जाण्याची सुनिश्चिती करील. मतदाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मतदान कक्षात प्रवेश करण्याची परवानगी नसेल.

(६) कोणत्याही मतदारास या प्रयोजनासाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळेच्या आधी किंवा मतदानाची वेळ संपल्यावर मतदान कक्षात प्रवेश करण्याची परवानगी नसेल.

(७) मतदान सुरू होण्याच्या आधी, मतदान अधिकारी उमेदवारास किंवा मतदान केंद्रावर हजर असणाऱ्या त्याच्या अधिकृत मतदान प्रतिनिधीस मतपेटी रिकामी असल्याचे दाखवेल आणि ती मतपेटी वापरण्यासाठी बंद करून मोहरबंद केली जाईल.

(८) मतदारास मतपत्रिका देण्याआधी, स्थळप्रतीवर मतदाराचा क्रमांक नोंदवण्यात येईल, आणि त्यावर मतदाराची स्वाक्षरी घेतली जाईल, आणि मतपत्रिका देणारा अधिकारी, त्याच्याकडील मतदार यादीच्या प्रतीत, ज्या मतदारास मतपत्रिका देण्यात आली आहे अशा मतदाराच्या क्रमांकापुढे खूण करील.

(९) मतपत्रिका मतदारास देण्याआधी, मतदाराच्या उजव्या हाताच्या तर्जनीवर (forefinger) पक्क्या शाईने खूण करण्यात येईल. मतदारास तर्जनी नसल्यास, मतदाराच्या उजव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटावर खूण करण्यात येईल, आणि जर मतदाराच्या उजव्या हाताची सर्वच बोटे नसल्यास, मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर किंवा इतर कोणत्याही बोटावर पक्क्या शाईने खूण करण्यात येईल, आणि जर मतदाराच्या दोन्ही हातांची बोटे नसतील तर, त्याला असणाऱ्या उजव्या किंवा डाव्या हातावर पक्क्या शाईची खूण केली जाईल.

(१०) मतपत्रिका मिळाल्यानंतर मतदार तात्काळ, त्याला आपल्या पसंतीक्रमावर/क्रमांवर खूण करून, ती मतपत्रिका मतपेटीत टाकता येईल अशा मतदार कक्षाकडे जाईल.

(११) मतदार, अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक विकलतेमुळे, सहाय्याशिवाय मतपत्रिकेवर खूण करू शकत नाही अशी मतदान अधिकाऱ्याची खात्री पटल्यास, तो मतदारास त्याच्या (मतदाराच्या) वतीने आणि त्याच्या इच्छेनुसार मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी आणि गरज वाटल्यास, मतदानाची गुप्तता राखण्यासाठी व मतपत्रिकेची घडी घालून ती मतेटीत टाकण्याकरिता अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल अशा साथीदारास मतदान कक्षात घेऊन जाण्याची परवानगी देईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस, त्याच दिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर एकापेक्षा जास्त मतदारांसोबत साथीदार म्हणून काम करण्याची परवानगी देण्यात येणार नाही:

परंतु आणखी पुढे असे की, कोणत्याही दिवशी, कोणत्याही व्यक्तीस, मतदाराचा साथीदार म्हणून काम करण्याची परवानगी देण्याआधी, तो मतदाराच्या वतीने नोंदवलेले मत गोपनीय ठेवेल आणि त्याने त्या दिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर, कोणत्याही इतर मतदाराचा साथीदार म्हणून काम केलेले नाही अशी घोषणा करणे आवश्यक असेल. मतदान अधिकारी अशा प्रकारे केलेल्या घोषणांची नोंद ठेवील आणि ती कुलसचिवांना सादर करील.

(१२) अनावश्यक दिरंगाई न करता प्रत्येक मतदार मतदान करील, आणि आपली मतपत्रिका मतपेटीत टाकल्यानंतर तात्काळ मतदान केंद्रातून बाहेर पडेल.

(१३) मतदानाचा कालावधी संपल्यानंतर, मतपेटी मोहोरबंद करण्यात येईल आणि विद्यापीठाच्या ताब्यात देण्यात येईल.

(१४) जर मतदाराने अनवधानाने आपली मतपत्रिका खराब केल्यास, त्याला दुसरी मतपत्रिका देता येऊ शकेल आणि खराब झालेली मतपत्रिका आणि त्याची स्थळप्रत मतदान अधिकाऱ्याद्वारे रद्द करण्यात येईल. सर्व खराब झालेल्या मतपत्रिका आणि स्थळप्रती मतदान अधिकाऱ्याद्वारे कुलसचिवांकडे पाठविण्यात येतील.

(१५) मतदारास, मतदान कक्षात भ्रमणध्वनी, टॅबलेटस् किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक संपर्क साधन घेऊन जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही.